# इतिहास विभागाचा अहवाल (२०१९ -२०२० )

आमचे श्री पंढरीनाथ कला वाणिज्य महाविद्यालय नरखेड येथे सन १९७१ पासून महाविद्यालयात इतिहास विषय सुरु असून सत्र २०१९ – २०२० मध्ये १५ जुन पासून महाविद्यालयीन सत्र सुरु झाले. सुरुवातीला १५ जून ते ३० जून या कालावधीत विद्यार्थ्यांचे विद्यापीठाच्या नियमानुसार प्रवेश निश्चित करण्यात आले.

बी. ए. प्रथम वर्षात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे महाविद्यालयाच्या वतीने स्वागत करण्यात आले. त्यानंतर इतिहास उद्घाटन मंडळाची स्थापना करण्यात आली. इतिहास उद्घाटन मंडळाचे प्रमुख , महाविद्यालायचे प्राचार्य व इतिहास विभाग प्रमुख डॉ. जयंत जवंजाळ हे अध्यक्ष होते. तर सहाय्यक प्राध्यापक डॉ. सुधाकर एन. पवार हे सचिव होते. तर पाच सदस्यांची नियुक्ती करण्यात आली. त्यामध्ये श्री चेतन श्रावण सातपुते (B. A. I) आशिष अनंतराव थोते ( B.A. II) , कु. निराशा भारत गौतम (B. A. II) श्री अमन कैलाश विटणकर (B. A. III) कु. ज्योती परसराम गजभिये हे सदस्य होते.

या मंडळां अंतर्गत इतिहास उद्घाटन मंडळाचा कार्यक्रम घेण्यात आला. मंडळाच्या उद्घाटना करिता राणी लक्ष्मी महाविद्यालय सावरगाव येथील इतिहास विभाग प्रमुख डॉ. क्षीरसागर यांनी मार्गदर्शन केले. व कार्यक्रम यशस्वी रित्या पार पडला. कार्यक्रमास इतिहास विभागाचे विद्यार्थी उपस्थित होते. तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकांनी सहभाग घेऊन यशस्वी रित्या कार्यक्रम पार पाडला.

सन २०१९ – २० मध्ये शिक्षक दिन निमित्य दि. ५ सप्टेंबर ला कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान महाविद्यालायचे प्राचार्य डॉ. जयंत जवंजाळ यांनी भूषविले. श्री समर्थ कला वाणिज्य महाविद्यालय आष्टी येथील प्राध्यापक डॉ. विलास फरकाडे यांनी वक्ते म्हणून मार्गदर्शन केले. अशा प्रकारे कार्यक्रम यशस्वी रित्या पार पडला.







**Principal**
**Shree Pandharinath Arts &**
**Commerce College, Narkhed.**